स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १० ऑक्टोबर, २०२२

जळगाव दि. १० (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने विद्यापीठ प्रशाळास्तरीय व जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत नोंदणी करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मागणीमुळे ऑनलाईन नोंदणीसाठी ११ ऑक्टोबर पर्यंत आणि हार्ड कॉपी जमा करण्यासाठी दिनांक १३ ऑक्टोंबर पर्यंत मुदत वाढवून देण्यात आली आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने दिनांक १८ अक्टोंबर २०२२ रोजी सुरूवातीला एकाच दिवशी तिन्ही जिल्ह्यासाठी व दिनांक २० ऑक्टोंबर २०२२ रोजी विद्यापीठातील विविध प्रशाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ कॅम्पस् वर आविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा संपन्न झाल्यानंतर यातील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील निवडक विद्यार्थी, संशोधन विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी दिनांक ११ व १२ नोव्हेंबर २०२२ रोजी विद्यापीठस्तरावर विद्यापीठात आविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आविष्कार २०२२ या नावाने स्वतंत्र पोर्टल देखील तयार करण्यात आले असून स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी करिता दिनांक १० सप्टेंबर २०२२ पासून लिंक ओपन करून देण्यात आली होती. दिनांक ०८ ऑक्टोबर २०२२ पर्यंतची मुदत देण्यात आली होती. परंतु महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मागणीमुळे मुदत वाढवून देण्यात येत असून आता ऑनलाईन नोंदणीसाठी ११ ऑक्टोबर पर्यंत व हार्ड कॉपी जमा करण्यासाठी दिनांक १३ ऑक्टोंबर पर्यंत मुदत वाढवून देण्यात आली आहे. विद्यापीठाच्या लिंक वर जाऊन सर्वांना नाव नोंदणी व शुल्क देखील भरता येणार आहे असे आवाहन या वर्षीच्या स्पर्धेचे समन्वयक प्रा. सतिष कोल्हे, प्रा.जयदीप साळी व प्रा. सुनील कुलकर्णी प्रभारी संचालक विद्यार्थी विकास यांनी केले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी